**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**

e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in


पत्र कमांक / नाविमं / पमा / 3569
दिनांक : 03 / 12 / 2024

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये,
नागपूर विभाग. नागपूर

विषयः— फेब्रुवारी मार्च—2025 मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षा बाबत.

संदर्भः— (1) जा.क्र. — रा.म. / परीक्षा — 6 / 4503, दि. 21 / 11 / 2024
(2) जा.क्र. — रा.म. / परीक्षा — 6 / 4504, दि. 21 / 11 / 2024
(3) जा.क्र. — रा.म. / परीक्षा — 6 / 4555, दि. 27 / 11 / 2024
(4) या कार्यालयाचे पत्र क्र. — ना.वि.म. / परीक्षा माध्य. / 3476, दि. 22 / 11 / 2024

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की,

(1) फेब्रुवारी — मार्च 2025 मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या अधिकृत संकेतस्थळावर दि. 21 / 11 / 2024 पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या बाबत संदर्भिय क्रमांक 2 अन्वये कळविण्यात आले आहे.

तसेच मंडळामार्फत विद्यार्थी / शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या सोईसाठी **MSBSHSE** हे **Android Mobile Application** विकसित करण्यात आलेले असून ते **Google Play Store** मध्ये **Download** करण्याकरीता उपलब्ध करून देण्यात आले आहे. सदर **Mobile Application** मध्ये मंडळामार्फत नुकतेच प्रसारित करण्यात आलेली इ. 10 वी व इ. 12 वी फेब्रुवारी — मार्च 2025 परीक्षेची वेळापत्रके, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी मार्च—2024 परीक्षेच्या ठराविक विषयाच्या प्रश्नपत्रिका तसेच विविध परिपत्रके शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना उपलब्ध होतील.

(2) "महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी — मार्च — 2025 मध्ये घेण्यात येणा—या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. 10 वी) परीक्षेत गणित आणि विज्ञान या विषयांकरिता मंडळाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणेच उत्तीर्णतेचे निकष असणार आहेत. ज्यावर्षी या निकषात बदल होतील त्यावेळी मंडळामार्फत स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल, याची नोंद सर्व शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक व अन्य संबधित घटक यांनी घ्यावी." अशा आशयाचे प्रकटन संदर्भिय पत्र क्र. 1 च्या प्रकटनाव्दारे मंडळामार्फत प्रसिध्द करण्यात आले आहे.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

प्रत माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव :—

1) मा. सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे—4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून दयावे.